<u>शिक्षकांच्या ज्येष्ठतासुची बाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**

**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः- संकिर्ण २०१६/प्र.क्र. ३२०/टीएनटी-१**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२.

दिनांक :- ०३ मे, २०१९.

<u>वाचा :-</u> शासन परिपत्रक, सम क्रमांक दि. १४ नोव्हेंबर, २०१७ आणि २४ जानेवारी, २०१७.

<u>प्रस्तावना :-</u>

पदवीधर शिक्षकांच्या जेष्ठतासूचीबाबत कार्यपध्दती वाचा येथील दि. १४ नोव्हेंबर, २०१७ आणि २४ जानेवारी, २०१७ च्या परिपत्रकान्वये विहित करण्यात आलेली होती. सदर परिपत्रकास मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. १४२४२/२०१८ व इतर अनुषंगिक याचिकान्वये आव्हानित करण्यात आले होते. त्या अनुषंगाने मा. न्यायालयाने खालील प्रमाणे आदेश पारित केले आहेत.

We therefore allow all the writ petitions, holding :

(a) The two Government Circulars of २४ th January २०१७ and १४th November २०१७ may stand unaffected vis-à-vis the primary Teachers.

(b) Those two Government Circulars, however, cannot be sustained vis-à-vis the Secondary Teachers, to the extent those GRs mandate that the teachers seniority be reckoned from the date of their first appointment and continuous service.

(c) The Government and the authorities concerned, including the School Managements, will recalibrate the relative seniority of the Secondary Teahers based on the Category they belong to and based on when they have entered that Category.

So we declare. No order on costs.

मा. न्यायालयाच्या उक्त आदेशानुसार शिक्षकांची सेवाजेष्ठतेबाबतचे वाचा येथील दि. १४ नोव्हेंबर, २०१७ आणि २४ जानेवारी, २०१७ चे परिपत्रक अधिक्रमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन परिपत्रक :-**

शासन परिपत्रक सम क्रमांक दि. १४ नोव्हेंबर, २०१७ आणि २४ जानेवारी, २०१७ अधिक्रमित करण्यात येत आहेत.

२. खाजगी शाळेतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांची सेवाजेष्ठता महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१, नियम १२ मधील अनुसूची “फ” मधील तरतूदीनुसार निश्चित करण्यात यावी. मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची सेवाजेष्ठता संबंधित शिक्षक त्या त्या प्रवर्गात समावेश झाल्याच्या दिनांकापासून ठरविण्यात यावी.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक क्रमांक २०१९०५०३१५४६२३२०२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Swapnil Yashwantrao Kapadnis

Digitally signed by Swapnil Yashwantrao Kapadnis
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9d4a2777935572a300d248b2271dd1361e9daca04be6c6776fa9545e2476799d, cn=Swapnil Yashwantrao Kapadnis
Date: 2019.05.03 15:51:44 +05'30'

**( स्वप्निल कापडणीस )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. आयुक्त ( शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
२. संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राजय, पुणे.
३. संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद,महाराष्ट्र राज्य, पुणे
५. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व),
६. शिक्षणाधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
७. सर्व प्रशासन अधिकारी, महानगरपालिका/नगरपालिका.
८. सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक)/ (माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. शिक्षण निरिक्षक, बृहन्मुंबई (दक्षिण/उत्तर/पश्चिम).
१०.निवड नस्ती, टीएनटी-१.